


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८५ वा सोमवार दि ०८ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अखेर लढ्याला यश आलं! मनोज जरांगे इम्पॅक्ट, मराठा समाजासाठी मोठे निर्णय; वाचा संपूर्ण शासन निर्णय...

**वृत्तसंस्था मुंबई**

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने शुक्रवारी जाहीर केला. यात प्रामुख्याने आठ निर्णयांचा समावेश आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसृत केला आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी नुकतेच उपोषण केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार प्रसाद लाड यांनी जरांगे यांची समजूत घालून हे उपोषण स्थगित केले. यावेळी सरकारने जरांगे यांना विविध आश्वासने दिली. या पार्श्वभूमीवर हा निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयानुसार राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांना लागू असलेली शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही लागू करण्यात येणार आहे. याशिवाय या विद्यार्थ्यांसाठी मोटार वाहनचालक व वाहक प्रशिक्षण योजना नियोजन विभाग सारथी संस्थेमार्फत राबवण्यात येणार आहे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेली शिष्यवृत्ती योजनाही मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लागू करण्यात येणार आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पीपीपी योजनेअंतर्गत उपलब्ध जागांवर, तसेच खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना सुरू आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना शुल्कमाफी दिली जाते. ही योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठीही आता लागू करण्यात येणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विकास विभागाकडून ती राबवण्यात येणार आहे. अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर १६ बाबींची प्रतिपूर्ती योजना म्हणजे शुल्कमाफी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी. राज्यातील रहिवासी असणाऱ्या व परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या ओबीसी उमेदवारांसाठीची



योजनाही या विद्यार्थ्यांना लागू करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत शिक्षण, परीक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, काही प्रकरणांत निर्वाह भत्ता दिला जातो. ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांसाठी आता मराठा समाजातील विद्यार्थीही पात्र ठरणार आहेत. केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (सीएपी) पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक सवलती लागू केल्या जाणार आहेत. दरम्यान, योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासकीय विभागांनी मराठा समाजातील पात्र लाभार्थ्यांचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक ते तांत्रिक बदल करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञा विभागास सूचना द्याव्यात, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आलेलं आहे.

# आंदोलनाने दिल्ली गाजवली, महाराष्ट्रात पाऊल ठेवताच अभिजीत दीपकेचा सरकारला इशारा, पुढचा प्लॅन सांगितला

**वृत्तसंस्था छत्रपती संभाजीनगर**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीतील जंतरमंतरवर ६ ते ७ हजार लोकांच्या उपस्थितीत भव्य आंदोलन केल्यानंतर, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके आज पहाटे ५ वाजता छत्रपती संभाजीनगर इथं दाखल झाले. अमेरिकेतून थेट भारतात परतत दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांविरोधात रणशिंग फुंकणारे दीपके वाळूज महानगर येथील आपल्या निवासस्थानी पोहोचताच समर्थकांनी त्यांचे जंगी स्वागत केले. या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना अभिजीत दीपके यांनी यापुढे हे आंदोलन अधिक तीव्र करत देशव्यापी करण्याचा थेट इशारा दिला आहे. छत्रपती संभाजीनगरात आल्यानंतर पहिली प्रतिक्रिया देताना अभिजीत दीपके म्हणाले, कॉकरोच जनता पार्टीने उभारलेले दिल्लीतील आंदोलन पूर्णपणे यशस्वी झाले आहे. नीट परीक्षेतील घोटाळ्याविरोधात झालेल्या या आंदोलनात तब्बल ६ ते ७ हजार लोक सहभागी झाले होते. मात्र, ज्या मुख्य मागणीसाठी आम्ही रस्त्यावर उतरलो, ती मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आमचा हा लढा इथेच थांबणार नाही, तर तो पुढेही सुरूच राहील. केंद्रीय मंत्र्यांना थेट आव्हान देत दीपके पुढे म्हणाले, लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लावणारे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान जोपर्यंत आपल्या पदाचा राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आमचे आंदोलन थांबणार नाही. जंतरमंतरनंतर आता हे आंदोलन आम्ही संपूर्ण देशव्यापी करणार आहोत. या पुढील देशव्यापी आंदोलनाची रूपरेषा आणि तारीख लवकरच अधिकृतपणे जाहीर केली जाईल. अभिजीत दीपके आज पहाटे वाळूज महानगर येथील आपल्या निवासस्थानी पोहोचले. त्यांच्या आगमनानंतर कुटुंबातील सदस्यांनी त्यांचे औक्षण करत स्वागत केले. मात्र, दीपके यांनी कॉकरोच जनता पार्टी स्थापन केल्यापासून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला सातत्याने धमक्या येत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने कोणतीही जोखीम न पत्करता दपके यांच्या घराभोवती कडेकोट बंदोबस्त लावला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव अभिजीत दीपके यांच्या घरासमोर आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. पोलीस




सुरक्षेवर लक्ष ठेवून आहेत. याविषयी माहिती देताना पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी सांगितले की, दीपके यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी चोख खबरदारी घेतली आहे. त्यांच्या घराबाहेर बंदोबस्त तैनात असेल. परिसरात कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा अनुचित प्रकार आढळून आल्यास पोलीस तातडीने आणि कडक कारवाई करतील.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन



# येथल्या परीक्षेत का हारते मराठी?



जागतिकीकरणानंतर बदललेल्या महाराष्ट्रीय समाजजीवनाचे अवलोकन केले असता जाणवते, की एकूण समाजजीवनात आपण आपल्याच भाषेला, मराठीला ङ्गनापास ङ्ग केले आहे. ङ्गमराठी ही रोजगाराची भाषा नाही. ती माहिती तंत्रज्ञानाची भाषा नाही. ती उच्च शिक्षणाची भाषा नाहीफ अशा नकारघंटा वाजवून महाराष्ट्रीय समाजाने मराठीवर फुल्या मारून तिला नापास ठरवले. मग यंदा मराठी या विषयात दहावीत मोठ्या संख्येने मुले नापास झाली, याचे आपल्या समाजाला इतके आश्चर्य का वाटावे? प्रथम भाषा म्हणून मराठीफ आणि ङ्गदुसरी भाषा म्हणून मराठी ङ्गअशा दोन पातळ्यांवर मराठीचा अभ्यास शालेय स्तरावर केला जातो, म्हणजे ङ्गमराठी शाळांमध्ये शिकवली जाणारी मराठी ङ्गआणि ङ्गइंग्रजी शाळांमध्ये शिकवली जाणारी मराठीफ या दोहोंचा विचार शिक्षणव्यवस्थेत किती गांभीर्याने केला गेला, हे अभ्यासणे - समजून घेणे आवश्यक ठरते. मराठी ही आपली रोजचीच भाषा आहे, असे समजून खूपदा तिला गृहित धरले जाते. एकूण विषयांच्या चौकटीत गणित, विज्ञान, इंग्रजी हे विषय महत्त्वाचे, असा दृष्टिकोन समोर ठेवून मराठीला दुय्यम समजले जाते. या विषयांच्या ट्यूशन्स आणि क्लासेस यांसाठी खर्च केला जातो, हॉटेलिंगवर खर्च केला जातो; पण अवांतर वाचनासाठी मराठी पुस्तके विकत घेणे पालकांच्या जिवावर येते. त्यामुळे नेमलेल्या पाठ्यपुस्तकातील धडे-कविता यांच्या पलीकडे मुलांना मराठी वाचनाची सवय लागत नाही. भाषाग्रहणाचा मुलांचा प्रवास पाहिला तर लक्षात येते, की रोजच्या वातावरणातून, भोवतालच्या परिसरातून मूल शब्द शिकते. हळूहळू मुले स्वतःचा शब्दकोश तयार करतात. पालक आणि शिक्षकांनी मुलांना त्यांचे अनुभव व्यक्त करण्याच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून द्यायच्या असतात. त्यातून त्यांच्या भाषेची जडणघडण होते. वर्गात शिक्षकांनी मराठीच्या तासाला निबंध लिहून देण्याचा प्रकार अनेक शाळांतून दिसतो. मग सर्वांच्या निबंधातला ङ्गपाऊसफ सारखाच दिसतो आणि शब्दांच्या नानाविध छटा हरवून ते गुळगुळीत होतात. शब्दछटांमधले सौंदर्य समजून घेण्यातला आनंद मुलांना घ्यायला शिकवण्याची कला शिक्षकांना जमली तर मुले मराठीच्या अधिक जवळ जातील. मराठीशी जेव्हा त्यांची मैत्री होईल, तेव्हा ती कवयित्री इंदिरा संत यांनी त्यांच्या एका कवितेत व्यक्त केलेला अनुभव घेऊ शकतील. निबंध पाठ करून लिहिणे, रेडीमेड उत्तरे पाठ करून लिहिणे यातून विद्यार्थ्यांची सृजनशीलता खुंटत जाते. वाचन कौशल्य, संवाद कौशल्य, श्रवण कौशल्य हे कोणतीही भाषा आत्मसात करण्याचे महत्त्वाचे पैलू आहेत. लहानपणापासून मुलांच्या आकलन क्षमतेच्या स्तरानुसार आणि त्यांच्या वयोगटानुसार विविध पुस्तके मुलांच्या हाती दिली पाहिजेत. आचार्य अत्रे यांनी १९३०च्या दशकात पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी नवयुग वाचनमालेची निर्मिती केली. मुलांच्या मराठीच्या समृद्धीसाठी अत्र्यांनी निर्मिलेल्या या वाचनमालेने दोन ते तीन पिढ्यांवर भाषा संस्कार केले. अशा प्रकारच्या मराठी वाचन माला आणि पूरक पुस्तके मुलांसाठी प्रकाशित व्हायला हवीत. नॅशनल बुक ट्रस्ट, ज्योत्स्ना प्रकाशन यांचे प्रयत्न मुलांकरता पुस्तकेनिर्मितीबाबत उल्लेखनीय आहेत. चांदोबा, किशोर, टॉनिक, वयम या मोजक्याच अंकांनी बालवाचकांना अक्षरांचा खजिना दिला; पण हळूहळू एकूणच मराठी मासिकांचे जग आक्रसत चालले. वाचक नाहीत म्हणून अंक नाहीत, अंक आहेत तर वाचक नाहीत असले दुष्टचक्र फिरत राहिले. मुलांचा वयोगट समोर ठेवून मराठीत लेखन करणारे लेखक कमी आहेत. केवळ क्रमिक पुस्तकांतून मुलांची मराठी घडणार नाही. त्यासाठी जाणीवपूर्वक वेगळे प्रयत्न व्हायला हवेत. ङ्गवाचू आनंदेफ किंवा ङ्गलिहावे नेटकेफ ही माधुरी पुरंदरे यांची पुस्तके हे याचे उत्तम उदाहरण आहे. वेगवेगळ्या मॉल्समधून आज विविध विषयांवरील भरपूर इंग्रजी पुस्तके दिसतात, पण मराठी पुस्तके दिसत नाहीत, असली तर खपत नाहीत. ङ्गएकतारा प्रकाशनफची मुलांसाठीची खूप देखणी पुस्तके माझ्या पाहण्यात आली. अनुवादित स्वरूपात मराठीत देखील त्यांची पुस्तके उपलब्ध आहेत. मुलांना आवडतील अशी भरपूर चित्रे, ज्यायोगे त्यांना भाषेची गोडी लागेल असे त्यांचे स्वरूप आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# देशात आणीबाणी लागणार! मोदी वर्षभरात पंतप्रधान पद सोडणार; राहुल गांधींच्या दाव्याने खळबळ

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

कॉंग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत धक्कादायक दावे करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. एका कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी यांनी पुढील एका वर्षात नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावर राहणार नाहीत, असा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच देशात मोठे आर्थिक संकट येण्याची आणि लोकांच्या विरोधामुळे आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.



कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले की, देशातील परिस्थिती वेगाने बदलत आहे आणि सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणातील व्यवस्था आता ढासळू लागली आहे. त्यांच्या मते, सरकारच्या आतूनच संस्थात्मक पातळीवर विरोध सुरू झाला असून विविध यंत्रणांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. राहुल गांधी यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेबाबतही गंभीर इशारा दिला. त्यांच्या मते, केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेला संरक्षण देणाऱ्या अनेक महत्त्वाच्या यंत्रणा कमकुवत केल्या आहेत. त्यामुळे आगामी काळात देशाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो. ते म्हणाले, देशात अशी आर्थिक त्सुनामी येणार आहे, जी लोकांनी यापूर्वी कधीच पाहिलेली नाही. अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणारे कवचच काढून टाकण्यात आले आहे.

### 'व्यवस्थेच्या आतूनच बंड सुरू'

■ राहुल गांधी यांनी दावा केला की, काही महत्त्वाच्या संस्थांमधून त्यांना मेसेज येत आहेत. निवडणूक आयोग, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेतील काही व्यक्तींकडून असंतोष व्यक्त केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या मते, पूर्वी पूर्णपणे नियंत्रणात असलेल्या संस्था आता स्वतंत्रपणे विचार करू लागल्या असून सत्तेच्या विरोधात आवाज उठवत आहे.

### आणीबाणीची शक्यता व्यक्त

■ राहुल गांधी यांनी पुढे दावा केला की, लोकांमधील वाढता असंतोष दडपण्यासाठी सरकार कठोर पावले उचलू शकते. त्यांनी देशात आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त केली. त्यांच्या मते, जनतेचा दबाव वाढल्यास सत्ताधारी पक्ष परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करू शकतो.

## सक्तीच्या मजुरीने तयार वस्तूंची आयात सुरूच असल्याने कारवाई

### भारतासह 54 देशांवर 12.5 टक्के टेरिफ!

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधीने (यूएसटीआर) कलम ३०१ अंतर्गत भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरिफ) लावण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्यात या देशांना अपयश आले आहे. या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यातही त्यांनी कुचराई केली आहे, असा आरोप करण्यात आला आहे. यूएसटीआरने ६० देशांच्या चौकशीनंतर हा प्रस्ताव तयार केला आहे. मात्र, भारताने हे आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच, ही चौकशी थांबवण्याची मागणी केली आहे.

या ५४ देशांमध्ये भारताव्यतिरिक्त चीन, जपान, ब्राझील, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, सौदी अरेबिया आदी देशांचा समावेश आहे. ज्या देशांमध्ये सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंच्या आयातीवर बंदी आहे किंवा ज्यांनी



ती लागू करण्याचे आश्वासन दिले आहे, त्यांच्यावर केवळ १० टक्के अतिरिक्त शुल्क आकारले जाईल, असे यूएसटीआरने म्हटले आहे. अमेरिकी व्यापार कायद्यात कलम ३०१ काय आहे? अमेरिकी व्यापार कायद्यातील ही अतिशय आक्रमक कायदेशीर तरतूद आहे. याच्या मदतीने अमेरिका कोणत्याही देशावर मनमानी निर्बंध किंवा भारी आयात शुल्क लावू शकते. हे शुल्क लागू झाले, तर भारताचा कापड उद्योग, ॲल्युमिनियम, कापूस, सी-फूड, कॉफी आणि तांदूळ अमेरिकेत महाग होतील. मात्र, भारतीय औषधे यातून वगळण्यात आली आहेत.

## द्रमुकचा इंडिया आघाडीला झटका!

**चेन्नई :** तमिळनाडूमध्ये थलपती विजय यांच्या सरकारमध्ये कॉंग्रेस सामील झाल्यानंतर, डीएमकेने विरोधी पक्षांच्या ऐक्याला मोठा धक्का दिला आहे. ८ जून रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या 'इंडिया' आघाडीच्या बैठकीपासून डीएमकेने अंतर राखले आहे. निवडणूक निकालानंतर कॉंग्रेसने डीएमकेसोबत जो विश्वासघात केला, त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते अजूनही प्रचंड दुखावलेले आहेत, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे.

गेल्या महिन्यात जाहीर झालेल्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालात विजय यांच्या 'टीव्हीके' पक्षाने चमकदार कामगिरी करत १०८ जागा जिंकल्या, ज्यामुळे डीएमकेला आपली सत्ता गमवावी लागली. यानंतर कॉंग्रेसने सर्वात आधी टीव्हीकेला पाठिंबा देण्याची घोषणा केली. त्यानंतर डाव्या पक्षांसह इतर छोट्या पक्षांनी आणि एआयएडीएमकेच्या आमदारांनीही विजय यांच्या बाजूने मतदान केले. कॉंग्रेस हा दीर्घकाळापासून डीएमकेचा मित्रपक्ष राहिला आहे, अगदी राहुल गांधी डीएमके प्रमुख एम. के. स्टॅलिन यांना आपला भाऊ मानत असत.

## अखेर मान्सून भारतात दाखल; केरळमध्ये जोरदार पाऊस

■ मुंबई/वृत्तसंस्था

बऱ्याच प्रतीक्षेनंतर भारतात मान्सूनचे आगमन झाले आहे. नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे, असे भारतीय हवामान विभागाने गुरुवारी जाहीर केले. दक्षिण भारतातील या राज्यात बऱ्याच काळापासून पाऊस सुरू होता, पण आता याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे राज्यात १ जूनला मान्सूनचे आगमन होणार होते.

हवामान विभागाने सुरुवातीला असा अंदाज वर्तवला होता की, केरळमध्ये मान्सून २६ मे पर्यंत दाखल होऊ शकतो. तेव्हा चार दिवसांचा विलंब किंवा लवकर आगमन होण्याचाही अंदाज वर्तवला होता. पावसाळा ३० मे पर्यंत सुरू होऊ शकतो अशी शक्यता वर्तवली होती. तरीही मान्सूनला विलंब झाला. इतकेच नव्हे तर मान्सून नेहमीच्या १ जूनच्या तारखेला दाखल झाला नाही, त्यामुळे पावसाला चार दिवसांचा उशीर झाला.

गुरुवारी सकाळी केरळच्या अनेक जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यात अलप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांचा समावेश होता. राज्यातील काही भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वेगवान वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तिरुवनंतपुरम, कोल्लम, पत्तनमथिट्टा, इडुक्की आणि त्रिशूर जिल्ह्यात पावसाच्या सौम्य ते मध्यम सरी कोसळण्याचा अंदाज आहे.


केरळसह तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक जिल्ह्यात पुढील सात दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळच्या अनेक भागात आधीच जोरदार पाऊस सुरू आहे. ओडिशा, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, दिल्ली, तेलंगणासह २४ राज्यांमध्ये पाऊस आणि वेगवान वारे वाहतील असे हवामान खात्याने सतर्क केले आहे. हवामानातील बदलामुळे आजही गुजरात, पश्चिम राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान ४० डिग्री सेल्सिअसपुढे आहे.

## महायुतीच्या १७ पैकी सहा जागा अविरोध; महाविकास आघाडीला धक्का

■ मुंबई/वृत्तसंस्था

राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका सुरू आहेत. विधान परिषदेसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे, पण मतदानाआधीच मोठा खेळ झाल्याचे पाहायला मिळत आहे. महायुतीचे तब्बल सहा उमेदवार अविरोध निवडून आल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात १७ जागांसाठी निवडणूक होणार असून गुरूवारी अर्ज माघारीची शेवटची मुदत होती. अनेक ठिकाणी बंडखोरीही झाली होती. महायुतीला बंडखोरी रोखण्यात यश आले असून महाविकास आघाडीला आठ ठिकाणी झटका बसला आहे.

महायुतीला १७ जागांपैकी सहा जागा या बिनविरोध करण्यात यश आले आहे. यामध्ये ठाणे मतदारसंघात



रवींद्र फाटक, कोकण मतदारसंघात अनिकेत तटकरे, यवतमाळ, वर्धा- गडचिरोली- चंद्रपूर मतदारसंघात भाजपाचे अरुण लखाणी, पुणे मतदारसंघात विक्रम काकडे आणि अहिल्यानगर मतदारसंघात भाजपचे प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती समोर आली आहे. महायुतीने या सहा जागांवर बिनविरोध विजय मिळवत महाविकास आघाडीला धक्का दिला आहे.

नाशिकमधील राजकीय वातावरण तापले असून, अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांच्या उमेदवारी अर्जाच्या माघारीवरून शेवटच्या क्षणापर्यंत नाट्य पाहायला मिळाले. गोकुळ गीते यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, यासाठी महायुतीच्या नेत्यांकडून शेवटच्या मिनिटापर्यंत शर्थीचे प्रयत्न सुरू होते. मात्र, एका वादग्रस्त ऑडिओ क्लिपमुळे हा संपूर्ण निर्णय फिरल्याचा खळबळजनक दावा आता गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय निलेश बोरा आणि नाना गामने यांनी केला आहे.

# हॉस्पिटलला भीषण आग; आयसीयूमध्ये अडकलेल्या 10 रुग्णांचा होरपळून मृत्यू

■ मुझफ्फरपूर/वृत्तसंस्था

बिहारमधील मुझफ्फरपूर येथील ब्रह्मपुरा भागात असलेल्या 'प्रसाद हॉस्पिटल'ला रात्रीच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. आगीच्या ज्वाळा इतक्या तीव्र होत्या की त्यांनी काही वेळातच रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाला पूर्णपणे कचाट्यात घेतले. या भीषण दुर्घटनेत रुग्णालयात दाखल असलेले दोन डझनहून अधिक रुग्ण थेट होरपळले असून, प्राथमिक माहितीनुसार यामध्ये १० रुग्णांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मात्र, मृतांच्या अधिकृत आकड्याबाबत अद्याप प्रशासनाकडून अंतिम पुष्टी मिळणे बाकी आहे.

रुग्णालयाच्या इमारतीला लागलेल्या या आगीचे प्राथमिक कारण विजेचे शॉर्ट सर्किट असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या आगीमागचे नेमके आणि वास्तविक तांत्रिक कारण काय होते? हे सविस्तर तपासणीनंतरच स्पष्ट होईल. घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा प्रशासनाने





या संपूर्ण प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास आयसीयूमधून अचानक धूर आणि आगीच्या लहरी उठू लागल्या. हे पाहताच संपूर्ण रुग्णालयात एकच गोंधळ उडाला आणि रुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले. घटनेची भीषणता पाहता रुग्णालयातील कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेत आयसीयूच्या खिडक्या तोडल्या आणि रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे काम सुरू केले. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या ८ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी तातडीने फौजफाट्यासह प्रसाद हॉस्पिटलमध्ये पोहोचले. अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. या दुर्घटनेत होरपळलेल्या सर्व रुग्णांना तातडीने रुग्णवाहिकेच्या साहाय्याने शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## विषारी दारू प्रकरणातील मुख्य आरोपीच्या घरावर बुलडोझर; पिंपरी-चिंचवड महापालिकेची मोठी कारवाई

■ पिंपरी-चिंचवड/वृत्तसंस्था

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विषारी दारू दुर्घटनेतील मुख्य आरोपी गुरुमंगलसिंग विरक यांच्या अनधिकृत निवासस्थानावर पिंपरी-चिंचवड महापालिकेने मोठी कारवाई केली आहे. आरोपीच्या संजयनगर झोपडपट्टीतील अनधिकृत घराचे बांधकाम महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने हातोडा मारून जमीनदोस्त केले. या घराचा वापर अवैध दारूविक्रीसाठी केला जात असल्याच्या तक्रारीनंतर, प्रशासनाने हे बांधकाम बेकायदेशीर ठरवून जमीनदोस्त केले. महापालिकेच्या या आक्रमक कारवाईमुळे शहरातील अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सांगितले की, “या प्रकरणाबाबत, महानगरपालिकेच्या झोपडपट्टी आणि पुनर्वसन विभागाने एक




निवेदन जारी केले आहे. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, सन २००० मध्ये महापालिकेने केलेल्या झोपडी सर्वेक्षणाच्या अधिकृत यादीत सिंग विरक यांचे नाव आढळलेले नाही. परिणामी, २ जून रोजी त्यांना २४ तासांची नोटीस बजावण्यात आली होती.


या नोटिशीत असे स्पष्ट करण्यात आले होते की, जर त्यांची झोपडी रीतसर अधिकृत असेल, तर त्यांनी त्याशी संबंधित आवश्यक कागदपत्रे सादर करावीत अन्यथा, जर ते बांधकाम अनधिकृत असेल, तर त्यांनी स्वतःहून ते पाडून टाकावे. नोटिशीत असा इशाराही देण्यात आला होता की, जर त्यांनी स्वतःहून हे बांधकाम हटवले नाही, तर महानगरपालिका दंडात्मक कारवाई करेल. त्यांनी दिलेल्या २४ तासांच्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, महानगरपालिका—आमचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी झोपडपट्टी विभागामार्फत ही निष्कासनाची कारवाई केली आहे.”

## हॉटेल आगीप्रकरणी मालकाला अटक; साकेत न्यायालयाकडून 4 दिवसांची पोलीस कोठडी

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

दिल्लीच्या मालवीय नगर भागात असलेल्या एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये बुधवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीमुळे संपूर्ण देशाला हादरवून सोडले. मालवीय नगर आग प्रकरणातील आरोपी आणि मालवीय नगर हॉटेलचे मालक लवकेश बजाज यांना साकेत न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सुनावणीदरम्यान दिल्ली पोलिसांनी चार दिवसांची पोलीस कोठडी मागितली. सुनावणीदरम्यान, लवकेश बजाज यांच्या वकिलाने सांगितले की, त्यांना एफआयआरची प्रत मिळालेली नाही. यावर दिल्ली पोलिसांनी एफआयआरची प्रत देण्याचे आश्वासन दिले. बुधवारी पहाटे दिल्लीच्या मालवीय नगर भागातील एका प्रसिद्ध रेस्टॉरंटला लागलेल्या भीषण आगीने संपूर्ण देशाला धक्का बसला आहे. या प्रकरणी मोठी कारवाई करत दिल्ली पोलिसांनी बुधवारी हॉटेल मालक लवकेश बजाज यांना अटक केली. यापूर्वी त्यांच्या




आणि त्यांच्या पत्नीविरोधात लुकआऊट सर्क्युलर जारी करण्यात आले होते. ही आग इतकी भीषण होती की, हॉटेलमध्ये उपस्थित असलेल्या लोकांना प्रतिक्रिया देण्याची किंवा स्वतःचा बचाव करण्याची संधीही मिळाली नाही. आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या एकूण 49 जणांना तातडीने विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. यापैकी 21 जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृतांमध्ये 9 भारतीय नागरिक आणि 12 परदेशी नागरिकांचा समावेश आहे.

## आयव्हीएफ आणि सरोगसी सेंटरमार्फत होणाऱ्या बाल-तस्करीकडे 'ॲमिकस'ने वेधले लक्ष; सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकारला नोटीस



■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

आयव्हीएफ आणि सरोगसी केंद्रांमधील त्रुटींचा गैरफायदा घेऊन बाल तस्करीचे रॅकेट सक्रिय असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, अशा केंद्रांमधून होणारी बालतस्करी रोखण्यासाठी एक स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज आहे का? याची चाचपणी सर्वोच्च न्यायालय करत आहे. याप्रकरणी न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावून उत्तर मागवले आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. 'पिंकी विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य' या बाल तस्करी प्रकरणातील एप्रिल २०२५ च्या निकालाची देशभरात अंमलबजावणी होत आहे की नाही? यावर न्यायालय देखरेख ठेवून आहे. यादरम्यान, न्यायालयाला सहकार्य करणाऱ्या (ॲमिकस क्युरी) ज्येष्ठ वकील अपर्णा भट यांनी न्यायालयात एक अहवाल सादर केला. आयव्हीएफ आणि सरोगसी केंद्रांमधून होणारी बालतस्करी रोखण्यासाठी सध्या कोणतीही प्रमाणित कार्यपद्धती उपलब्ध नसल्याकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

एका बाल तस्करी प्रकरणाच्या चौकशी दरम्यान हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणातील काही आरोपींनी आपण एका आयव्हीएफ केंद्राशी जोडलेले 'अंडी दाते' असल्याचा दावा केला होता. यानंतर ॲमिकस क्युरी यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये 'असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह टेक्नॉलॉजी (नियमन) कायदा, २०२१' चे उल्लंघन होत असल्याची भीती व्यक्त केली होती. त्यावर न्यायालयाने दिल्ली पोलिसांना या बाजूने स्वतंत्र तपास करण्याचे आदेश दिले होते.

# वनडे मालिकेतून विराट कोहली बाहेर

## योजनांवर पाणी ; हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे होवू शकत नाही संघात सहभागी

**मुंबई/वृत्तसंस्था**

अनुभवी भारतीय खेळाडू विराट कोहली हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे अफगाणिस्तान विरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. विराटची दुखापत भारतीय संघासाठी एक मोठा धक्का आहे, कारण ही मालिका २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीच्या सुरुवातीसाठी महत्त्वपूर्ण मानली जात होती. विराट कोहलीने आयपीएलमध्ये जबरदस्त फॉर्म दाखवला होता. त्यामुळे अफगाणिस्तान विरुद्ध विराटकडून चाहत्यांना खूपच आशा होती. आता त्याला झालेल्या दुखापतीमुळे चाहते नक्कीच निराश झाले आहेत. विराटचा खेळ पाहण्यासाठी नेहमीच सगळे उत्सुक असतात. ३७ व्या वर्षीही उत्तम फॉर्ममध्ये विराट असल्यामुळे सर्वांचीच निराशा झाली आहे.

भारताचा माजी कर्णधार आयपीएल २०२६ संपल्यानंतर या मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज होता, परंतु या दुखापतीने त्याच्या योजनांवर पाणी फेरले. गेल्याच रविवारी, विराटने अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर



खेळल्या गेलेल्या आयपीएल २०२६ च्या हाय-व्होल्टेज फायनलमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध सामना जिंकून देणारे अर्धशतक झळकावले होते. त्याच्या शानदार खेळीमुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने सलग दुसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली. विराटने १६ डावांमध्ये ६७५ धावा केल्या, ज्या या मोसमात आरसीबीसाठी सर्वाधिक आणि स्पर्धेतील चौथ्या क्रमांकाच्या सर्वाधिक धावा आहेत. त्याने ५६.२५ ची प्रभावी सरासरी आणि १६५.८४ चा स्ट्राइक रेट राखला.

विराट कोहलीच्या दुखापतीच्या गंभीरतेची पुष्टी करताना, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या एका सूत्राने सांगितले, हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे तो अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत सहभागी होऊ शकणार नाही. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १३ जून रोजी सुंदर धर्मशाला मैदानावर सुरू होणार आहे, परंतु विराटसारख्या खेळाडूच्या अनुपस्थितीमुळे मालिकेची चमक लक्षणीयरीत्या कमी होईल असा अंदाज लावला जात आहे.

### कर्णधारपदावरून सूर्याची हकालपट्टी करण्याचे संकेत

आर्यलँड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघाच्या स्क्वॉडची घोषणा येत्या काही दिवसांत करण्यात येईल. अशातच अजित आगरकर एंड कंपनीने टी-२० विश्वकप विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवची टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हकालपट्टी करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे सूर्यकुमारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट करिअरचा द एंड झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या आहेत. या दौऱ्यांसाठी भारताच्या नव्या कर्णधाराची घोषणा केली जाईल. गतवर्षापासून सूर्यकुमार यादव बाबत अनेक चर्चा रंगल्या होत्या. टीम इंडिया जिंकत होती, पण सूर्यकुमार यादवचा फॉर्मबाबत सतत संघर्ष सुरू होता. गेल्या वर्षी सूर्यकुमारची अत्यंत खराब फॉर्म होता. त्याने २१ इनिंगमध्ये १५ च्या सरासरीनेही धावा केल्या नाहीत. भारतीय क्रिकेट बोर्डाने आता टी-२० संघाच्या भविष्याचा विचार करून नव्या कर्णधाराबाबत विचार सुरु केला आहे.

# इंडोनेशिया ओपन मधील सिंधूचे आव्हान संपुष्टात

## जगातील नंबर-१ एन से यंगकडून सरळ गेममध्ये हरली

**जकार्ता/वृत्तसंस्था**

भारताची स्टार शटलर पीव्ही सिंधू जकार्ता येथे सुरू असलेल्या इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या राउंड ऑफ-१६ मधून बाहेर पडली. गुरुवारी तिला जागतिक क्रमवारीत नंबर-१ आणि ऑलिम्पिक चॅम्पियन एन से यंगने २१-१७, २१-१४ अशा फरकाने हरवून स्पर्धेतून बाहेर केले. यंगने सिंधूला सलग दहाव्या सामन्यात हरवले आहे. दक्षिण कोरियाच्या यंगने सिंधूला गेल्या आठवड्यात सिंगापूर ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीतही हरवून स्पर्धेतून बाहेर काढले होते. सलग दुसऱ्या पराभवामुळे दक्षिण कोरियाच्या खेळाडूविरुद्ध सिंधूचा विक्रम आणखी खराब झाला आहे. सिंधूने आतापर्यंत एन से यंगला एकदाही हरवले नाही.

पहिल्या गेममध्ये सिंधूला एन से यंगने कडवे आव्हान दिले. एका वेळी स्कोअर १०-१० असा बरोबरीत होता आणि भारतीय





खेळाडू १५-१४ ने पुढेही गेली होती. पण त्यानंतर एन से यंगने सलग गुण मिळवत आघाडी घेतली. तिने ४१ शॉट्सची लांब रॅली जिंकल्यानंतर पहिला गेम २१-१७ ने आपल्या नावावर केला. दुसरा गेममध्ये दक्षिण कोरियाई खेळाडूने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. तिने १३-६ ची आघाडी घेतली आणि सिंधूच्या परत येण्याच्या प्रयत्नांना निष्फळ करत २१-१४ ने गेम आणि सामना आपल्या नावावर केला. उत्कृष्ट कोर्ट कव्हरेजमुळे यंग जिंकली एन से यंगचे उत्कृष्ट कोर्ट कव्हरेज आणि सतत दबाव निर्माण करण्याची क्षमता सामन्याचे निर्णायक पैलू ठरले. या विजयासह ती उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली, तर सिंधूला पुन्हा एकदा प्री-क्वार्टर फायनलमध्ये पराभव पत्करून बाहेर पडावे लागले.

# लॉर्ड्स क्रिकेट मैदानाचा ऐतिहासिक विक्रम

**लंडन/वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा संघ तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी इंग्लंडमध्ये दाखल झाला आहे. यातील पहिला सामना ४ जून रोजी लंडनच्या ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला गेला. किवी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या नाणेफेकीमुळे लॉर्ड्स क्रिकेट मैदानाने एक असा पराक्रम केला आहे, जो यापूर्वी इतर कोणत्याही मैदानावर झाला नव्हता. सर्वाधिक कसोटी सामन्यांचे आयोजन करण्याच्या बाबतीत लॉर्ड्स आधीच पहिल्या क्रमांकावर आहे आणि इंग्लंड व न्यूझीलंड यांच्यातील हा सामना या मैदानावरचा १५० वा कसोटी सामना आहे.

लॉर्ड्सवर पहिला कसोटी सामना १८८४ मध्ये खेळला गेला होता. इंग्लंडमधील लॉर्ड्स स्टेडियमला जागतिक क्रिकेटमधील एक ऐतिहासिक मैदान मानले जाते, कारण येथे पहिला कसोटी सामना १८८४ मध्ये खेळला गेला होता. तेव्हापासून, इंग्लंडचा



दौरा करणाऱ्या बहुतेक संघांनी लॉर्ड्सवर किमान एक सामना खेळला आहे. या स्टेडियमने अनेक मोठ्या स्पर्धांच्या अंतिम सामन्यांचे आयोजन केले आहे, ज्यात लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या आवृत्तीच्या विजेतेपदाच्या सामन्याचा समावेश आहे. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील हा सामना वगळता, त्यापूर्वी खेळल्या गेलेल्या १४९ कसोटी सामन्यांपैकी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने ५४ वेळा, तर प्रथम गोलंदाजी करणाऱ्या संघाने ४४ वेळा विजय मिळवला आहे. याशिवाय, ५१ सामने अनिर्णित राहिले आहेत.

# लिओनेल मेस्सी पुन्हा मैदानात उतरण्यास सज्ज

**अर्जेंटिना/वृत्तसंस्था**

फुटबॉलविश्वातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा फिफा विश्वचषक २०२६ येत्या १२ जूनपासून रंगणार आहे. यंदाचा विश्वचषक अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि विशेष ठरणार आहे. प्रथमच या स्पर्धेत तब्बल ४८ संघ सहभागी होणार असून अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे तीन देश मिळून १६ शहरांमध्ये या महास्पर्धेचे सह-आयोजन करणार आहे. या स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो म्हणजे अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी. कतार २०२२ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेत अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद मिळवून देणारा मेस्सी आता पुन्हा एकदा मैदानात उतरण्यास सज्ज झाला आहे.

३८ वर्षीय मेस्सीसाठी हा विश्वचषक ऐतिहासिक ठरू शकतो, कारण तो आपल्या कारकिर्दीतील सहावा फिफा विश्वचषक खेळण्याच्या उंबरठ्यावर आहे. याशिवाय मेस्सीकडे आता आणखी काही मोठे विक्रम मोडण्याची सुवर्णसंधी आहे. लिओनेल मेस्सीने आपला पहिला विश्वचषक २००६ साली खेळला. त्यानंतर २०१०, २०१४, २०१८ आणि २०२२ अशा सलग पाच स्पर्धांमध्ये त्याने अर्जेंटिनाचे प्रतिनिधित्व केले. आता फिफा विश्वचषक २०२६ मध्ये खेळल्यास तो सहा विश्वचषक खेळणारा इतिहासातील पहिला पुरुष फुटबॉलपटू ठरेल. विशेष म्हणजे पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि मेक्सिकोचा गुइलेर्मो ओचोआ यांनाही हा विक्रम करण्याची संधी आहे.

अर्जेंटिनाचा प्रशिक्षक लिओनेल स्कालोनीने याने पुन्हा एकदा मेस्सीवर विश्वास व्यक्त केला आहे. गतविजेता अर्जेंटिना सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. मेस्सीच्या अनुभवामुळे संघ अधिक मजबूत मानला जात आहे. जर अर्जेंटिनाने पुन्हा विश्वविजेतेपद पटकावले, तर मेस्सी कर्णधार म्हणून दोन फिफा विश्वचषक जिंकणारा इतिहासातील पहिला फुटबॉलपटू बनेल. अर्जेंटिनाने मेस्सीच्या कर्णधारपदाखाली २०१४ आणि २०२२ चे अंतिम सामने खेळले आहेत, त्यामुळे यावेळी अंतिम सामन्यात पोहोचल्यास हा महान कर्णधारपदाचा विक्रमही निश्चित होईल.



# ‘डॉन 3’ वादात कंगनावर अशोक पंडितांचा पलटवार; “निरर्थक बोलतेस, म्हणूनच तुला बंदी घातली होती”



चित्रपट ‘डॉन ३’ वादात रणवीर सिंगच्या समर्थनार्थ कंगना रणौतने दिलेल्या विधानावर फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईजचे मुख्य सल्लागार अशोक पंडित यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की कंगना निरर्थक बोलते, म्हणूनच तिला बंदी घातली होती. इंडस्ट्रीतील अनेक लोक आम्हाला शिवीगाळ करू लागले आहेत. काल कंगनानेही काहीतरी म्हटले. लोक संपूर्ण प्रकरण समजून न घेताच टिप्पणी करत आहेत. कंगनाने हेही म्हटले की मला इंडस्ट्रीने बंदी घातली आहे. मी म्हणालो, तू निरर्थक गोष्टी बोलतेस, म्हणूनच तुला बंदी घातली होती. ते पुढे म्हणाले, मला याची पर्वा नाही. येथे संपूर्ण चित्रपट उद्योगाचा मोठा मुद्दा सुरू आहे. तुला तर खरी गोष्टही माहीत नाही, तरीही तू बोलत आहेस. आम्ही रणवीरच्या विरोधात नाही. आम्ही फक्त घडलेल्या घटनेबद्दल बोलत आहोत.

रणवीर सिंगला मिळणाऱ्या असहकाराबद्दल कंगनाने म्हटले होते, तुम्ही मला हा प्रश्न विचारत आहात, मला तर प्रत्येकानेच बॅन केले आहे. मी हेच सांगू इच्छिते की जेव्हा तुमची प्रतिष्ठा वाढते, तेव्हा तुमचे शत्रूही वाढतात. असे कधीच होऊ शकत नाही की तुमची प्रतिष्ठा वाढेल आणि शत्रू वाढणार नाहीत. आज रणवीर सिंहने विचार करायला हवा की त्याची काय प्रतिष्ठा आहे की त्याचे इतके शत्रू निर्माण झाले आहेत.

अशोक पंडित म्हणाले की, फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईजने कधीही रणवीर सिंगवर बंदी घातली नव्हती. त्यांनी माध्यमांना विनंती केली की, या प्रकरणाला बंदी म्हणून सादर करू नये, कारण यामुळे गोंधळ निर्माण होतो. पंडित यांनी असेही म्हटले की फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज ला कोणालाही बंदी घालण्याचा अधिकार नाही. संघटना केवळ नॉन-कोऑपरेशन म्हणजे सहकार्य न करण्याचा निर्णय घेऊ शकते. त्यांच्या मते, कोणताही तंत्रज्ञ, कामगार, निर्माता किंवा कलाकार एखाद्या व्यक्तीसोबत काम करू इच्छितो की नाही, हा एक लोकशाही अधिकार आहे.

## ‘ग्राम चिकित्सालय’ सीझन २ ची घोषणा; २३ जूनपासून प्राइम व्हिडिओवर होणार प्रीमियर



भारतातील लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्म प्राइम व्हिडिओने आपल्या बहुप्रतिक्षित प्राइम ओरिजिनल मालिका ‘ग्राम चिकित्सालय’च्या दुसऱ्या सीझनच्या जागतिक प्रीमियरची घोषणा केली आहे. ही मालिका २३ जून रोजी भारतासह जगभरातील २४० हून अधिक देश आणि प्रदेशांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या नव्या पर्वात प्रेक्षकांचे लाडके कलाकार पुन्हा एकदा झळकणार आहेत. अभिनेता अमोल पराशर मुख्य भूमिकेत परतणार असून त्याच्यासोबत आकाश मखिजा, आनंदेश्वर द्विवेदी, विनय पाठक, आकांक्षा रंजन कपूर आणि गरिमा विक्रांत सिंग हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसतील. याशिवाय, लोकप्रिय अभिनेता दिनेश लाल यादव यांचीही या सीझनमध्ये विशेष उपस्थिती असणार आहे.

दिग्दर्शक ललितम तिवारी यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या मालिकेचे लेखन वैभव सुमन आणि श्रेया श्रीवास्तव यांनी केले आहे. ‘द वायरल फीवर’ निर्मित या हृदयस्पर्शी विनोदी नाटकाने पहिल्या सीझनपासूनच प्रेक्षकांची मने जिंकली होती. ग्रामीण भारतातील आरोग्य व्यवस्थेची वास्तववादी बाजू आणि गावकुसातील जीवनातील संघर्ष, माणुसकी, विनोद आणि नातेसंबंध यांचे प्रभावी चित्रण या मालिकेत करण्यात आले आहे.

काल्पनिक भाथकंडी गावावर आधारित असलेल्या या कथेत ग्रामीण भागातील आरोग्यसेवेपुढील आव्हाने आणि त्यावर मात करण्यासाठी झटणाऱ्या व्यक्तींची कहाणी दाखवण्यात आली आहे. दुसऱ्या सीझनमध्येही प्रेक्षकांना भावनिक, विनोदी आणि प्रेरणादायी घटनांचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

पहिल्या सीझनला मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर ‘ग्राम चिकित्सालय’च्या दुसऱ्या सीझनबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रामीण जीवनाचा वास्तववादी अनुभव आणि मनोरंजनाचा अनोखा संगम असलेली ही मालिका पुन्हा एकदा प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यास सज्ज आहे.‘ग्राम चिकित्सालय’ सीझन २ चा प्रीमियर २३ जून रोजी हिंदी भाषेत केवळ प्राइम व्हिडिओवर होणार आहे.

## ‘देऊळ बंद २ ’चं बॉक्स ऑफिसवर वर्चस्व



थिएटरमध्ये सध्या स्वामी भक्तांची गर्दी पाहायला मिळत आहे. तिसऱ्या रविवारी देखील 'देऊळ बंद 2' चित्रपट हाऊसफुल पाहायला मिळत आहे. आज चित्रपट रिलीज होऊन 18 दिवस पूर्ण झाले आहेत. तरीही सिनेमा पाहायला प्रेक्षक गर्दी करत आहे. प्रवीण तरडे दिग्दर्शित 'देऊळ बंद 2' चित्रपट २१ मे ला रिलीज झाला आहे. सोशल मीडियावर आणि वेबसाईट्सवर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार,'देऊळ बंद २' चित्रपट ९ ते १० कोटींच्या बजेटमध्ये बनला आहे. चित्रपटाने आपले बजेट कधीच वसूल केले आहे. चित्रपटाने आतापर्यंत किती कोटी कमावले, जाणून घेऊयात.

रिपोर्टनुसार, १८ व्या दिवशी प्रवीण तरडेंच्या 'देऊळ बंद २' चित्रपटाने १,१४९ शोमधून ३.१५ कोटी रुपयांची नेट कमाई केली. यामुळे भारतातील एकूण ग्रॉस कलेक्शन ७०.२८ कोटी रुपये आणि एकूण नेट कमाई ५९.७५ कोटी रुपये इतकी झाली आहे. चित्रपटाने तिसऱ्या रविवारी देखील बक्कळ कमाई केली आहे. चित्रपट अशीच कमाई करत राहिला तर लवकरच १०० कोटींचा टप्पा पार करेल. 'देऊळ बंद -2' चित्रपटाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना आळा घालणे आहे. आत्महत्या करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाहीत, तर बदलत्या परिस्थितीनुसार शेतीत बदल करण्याची गरज आहे, असा ठाम संदेश चित्रपटातून देण्यात आला आहे. चित्रपटाची कमाई शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी देण्यात येणार असल्याचे प्रवीण तरडेंनी सांगितले.

## सेन्सॉर बोर्डचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे निधन

सध्या चित्रपटसृष्टीतून एक अत्यंत दुखद बातमी येत आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ चित्रपट निर्मति आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे बॉलिवूडसह संपूर्ण मनोरंजन विश्वात शोककळा पसरली आहे. सेन्सॉर बोर्डातील त्यांच्या कडक भूमिकेसाठी ते ओळखले जात होते. पहलाज निहलानी गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते. प्रकृतीत काहीशी सुधारणा झाल्यानंतर त्यांना घरी आणण्यात आले होते. मात्र, राहत्या घरीच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाच्या वृत्ताला त्यांचे जवळचे मित्र शशी रंजन यांनी दुजोरा दिला आहे.

पहलाज निहलानी हे केवळ चित्रपट निर्मतिच नव्हते, तर चित्रपटसृष्टीतील प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांची ओळख होती. ते जवळपास २९ वर्षे असोसिएशन ऑफ पिक्चर्स अँड टीव्ही प्रोग्रॅम प्रोड्युसर्स या संस्थेचे अध्यक्ष होते. २००९ मध्ये त्यांनी या पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर २०१५ मध्ये त्यांची केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ अध्यक्षपदी नियुक्ती झाली. मात्र, २०१७ मध्ये त्यांना या पदावरून हटवण्यात आले.

त्यांच्या स्पष्टवक्तेपणा आणि बेधडक भूमिकांमुळे ते अनेकदा चर्चेत राहिले. १९८२ मध्ये प्रदर्शित झालेल्या हतकडी या चित्रपटाद्वारे त्यांनी निर्माता म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांच्या निर्मितीतील चित्रपटांमधून गोविंदा आणि चंकी पांडे यांसारख्या कलाकारांना बॉलिवूडमध्ये मोठी संधी मिळाली.

निहलानी यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती केली. त्यांचा आंखे हा चित्रपट १९९० च्या दशकातील सर्वाधिक यशस्वी आणि लोकप्रिय चित्रपटांपैकी एक मानला जातो. निर्माता म्हणून यशस्वी कारकीर्द घडवल्यानंतर निहलानी यांनी दिग्दर्शन क्षेत्रातही पाऊल टाकले. २०१२ मध्ये त्यांनी अवतार या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. तसेच अभिनयाचीही त्यांना आवड होती.



# कोऱ्हाळा बाजारच्या पाण्यावर संकट!

## पिंपळगाव धरणातून पाइपलाइनने विहिरीत पोहोचल्या मृत माशा; परिसरात दुर्गंधी



**जनसंचलन/मोताळा**

तालुक्यातील कोऱ्हाळा बाजारला पाणीपुरवठा करणाऱ्या पिंपळगाव धरणातून पाइपलाइनच्या साहाय्याने थेट गावातील विहिरीत मृत मासे पोहोचल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उन्हाळा सरत असताना धरणातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटली असून कडक उन्हामुळे पाणी अतिगरम झाले आहे. याच कारणामुळे धरणातील शेकडो मासे मृत झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हे मृत मासे पाइपलाइनमधून विहिरीत आल्याने विहिरीतील पाणी काहीसे सिल्वर रंगाचे दिसू लागले आहे. धरण आणि विहीर परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेबाबत ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने पाण्याची तपासणी करून विहीर व पाइपलाइन स्वच्छ करावी, तसेच नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# झेडपी शाळेत प्रवेशासाठी वासुदेव थेट पालकांच्या दारी!

**जनसंचलन/ खामगाव**



जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढावी, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश घराघरात पोहोचावा आणि पालकांचा झेडपी शाळांवरील विश्वास अधिक दृढ व्हावा, यासाठी बुलढाणा जिल्ह्यात शिक्षण विभागाकडून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे. खामगाव तालुक्यातील लाखनवाडा येथे या मोहिमेचा आगळावेगळा शुभारंभ करण्यात आला. या प्रवेशोत्सवात उपक्रमशील शिक्षक राजेश कोगदे यांनी चक्क पारंपरिक वासुदेव वेश धारण करून गावात घरोघरी जाऊन पालकांना भावनिक आणि प्रभावी आवाहन केले. गायनाच्या माध्यमातून त्यांनी पालकांना आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देण्याचे आवाहन केले. या अनोख्या उपक्रमाने गावकऱ्यांचे लक्ष वेधले असून, शिक्षणासाठी लोकजागृतीचा हा प्रभावी प्रयत्न ठरला आहे. राज्याचे शिक्षण मंत्री ना. भुसे यांनी २ जून रोजी राज्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन झेडपी शाळांच्या गुणवत्ता व पटसंख्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या होत्या. त्या सूचनांची बुलढाणा जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली असून लाखनवाडा येथील हा उपक्रम त्याच मोहिमेचा पहिला टप्पा मानला जात आहे. या मोहिमेदरम्यान शिक्षण विभागाच्या वतीने पालक, ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींना जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तेवर पूर्ण विश्वास ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. शाळेत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीची शाश्वती गटशिक्षणाधिकारी गजानन गायकवाड यांनी दिली. विशेष म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांनी नुकत्याच झालेल्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी तब्बल ३८ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधील आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे. या उपक्रमासाठी लाखनवाडा येथील जि.प. मराठी, उर्दू व जि.प. हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षणाधिकारी प्राथमिक विकास पाटील यांनी पालकांना आपल्या पाल्यांचा प्रवेश जिल्हा परिषद शाळेतच निश्चित करण्याचे आवाहन केले.

# नोकरीची आनंदवार्ता घेऊन परतणाऱ्या तरुणाचा अपघातात दुर्दैवी मृत्यू

## अंबाशी फाट्याजवळ हृदयद्रावक घटना!

**जनसंचलन/ चिखली**



मेहकर येथील बँकेत इंटरव्ह्यू देऊन निवड झाल्याचा आनंद घेऊन चिखलीकडे परतणाऱ्या २६ वर्षीय तरुणाचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. मृतकाचे नाव मयूर गजानन उमरे, रा. चिखली असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयूर उमरे हा ६ जून रोजी दुपारी मेहकर येथील बँकेत इंटरव्ह्यूकरिता गेला होता. इंटरव्ह्यूमध्ये त्याची निवड झाल्याने तो आनंदात चिखलीकडे परतत होता. मात्र चिखली-मेहकर रोडवरील अंबाशी फाट्याजवळ एक वयस्कर व्यक्ती रस्ता ओलांडत असताना त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात मयूरने अचानक ब्रेक मारला. यावेळी वाहनावरील ताबा सुटून तो रस्त्यावर जोरात आदळला. या अपघातात मयूरच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले. मात्र आज ७ जून रोजी सकाळी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. जखमी वयस्कर व्यक्तीवर चिखली येथील जवंजाळ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असल्याची माहिती आहे. या घटनेने चिखली परिसरात शोककळा पसरली असून पुढील तपास अंढेरा पोलीस करीत आहेत.

# देऊळघाटमध्ये एलसीबीचा दणका! ५.७८ लाखांचा गुटखा पकडला; स्विफ्ट डिझायरसह चालक ताब्यात



**जनसंचलन/ बुलढाणा**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला आणि मानवी आरोग्यास घातक गुटखा व सुगंधित पान मसाला विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्यांवर बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. देऊळघाट परिसरात सापळा रचून तब्बल ५ लाख ७८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी प्रतिबंधित गुटखा विक्री, वाहतूक आणि साठवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आशिष रोही यांच्या मार्गदर्शनाखाली पथक सक्रिय झाले होते. ७ जून रोजी गुप्त माहिती मिळाल्यानंतर बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील देऊळघाट येथे पथकाने सापळा लावला. यावेळी मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर क्रमांक -२८--५३०० या वाहनातून प्रतिबंधित गुटखा व सुगंधित पान मसाला आढळून आला. पोलिसांनी चालक शेख सलीम शेख ईस्माईल, वय ५९ वर्षे, रा. सैलानीनगर, चिखली याला ताब्यात घेतले. या कारवाईत ३ लाख २८ हजार ९०० रुपयांचा गुटखा आणि २ लाख ५० हजार रुपयांचे वाहन, असा एकूण ५.७८ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चूक कुणाची? विचारण्याआधीच दोन पी.आय निलंबित

## शिवानी कळमेकर बनावट हत्याकांडात आता वरिष्ठांचा नंबर कधी?

जनसंचलन/बुलढाणा

जळगाव जामोदच्या सरकटी लाश प्रकरणाने आता बुलढाणा पोलीस दलात अक्षरशः भूकंप घडवला आहे. शिवानी कळमेकर बनावट हत्याकांड प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर आणि जळगाव जामोद पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई झाल्याची मोठी अपडेट समोर आली आहे. मात्र सवाल इथेच थांबत नाही; तपासाला दिशा देणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार? असा थेट प्रश्न आता जनतेतून उपस्थित होत आहे. हॅलो बुलढाणाफ़े काही वेळापूर्वीच मैदानात; चूक नेमकी कुणाची? असा सवाल उपस्थित केला होता. मात्र सदानंद दाते यांच्या दौऱ्यापूर्वीच दोन निरीक्षकांवर निलंबनाचा बडगा उगारला गेल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते स्वतः या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी अमरावती सह जळगाव जामोदात येणार असल्याची सूत्रांची माहिती असून, या भेटीनंतर प्रकरणात आणखी मोठा ट्विस्ट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणात सुरुवातीपासूनच अनेक धक्कादायक प्रश्न उभे राहतात. कोणताही सबळ पुरावा नसताना आदिवासी समाजातील पिता-पुत्रांना अटक का करण्यात आली? अहवाल येण्याआधीच मृतदेह शिवानीचाच असल्याचा अंदाज पोलिसांनी कसा बांधला? सहा दिवसांच्या पोलीस कोठडीत नेमका कोणता तपास झाला? अनोळखी मृतदेहाची ओळख न पटताच पोलिसांनी निष्कर्ष कसा काढला? आणि सर्वात गंभीर म्हणजे, अनोळखी मृतदेहाचे खरे प्रकरण दडपण्यासाठी तर हे बनावट हत्याकांड उभे करण्यात आले नव्हते ना? तब्बल अधिकारी आणि अंमलदारांची टीम तपासात असतानाही मृत महिलेची ओळख अद्याप पटत नसेल, तर ही केवळ चूक आहे की तपासातील गंभीर गडबड? दोन निलंबित झाले; पण मार्गदर्शन करणाऱ्या वरिष्ठांची जबाबदारी कुठे? आता दाते यांच्या आढाव्यानंतर बुलढाणा पोलीस दलातील आणखी कोणावर कारवाईचा हातोडा कोसळतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



# लाखोंचा खर्च पण दर्जा कुठे?

## मेहेकरच्या नव्या पोलीस स्टेशनला उद्घाटनाआधीच तडे; ठेकेदार-अधिकाऱ्यांची चौकशी होणार का?



जनसंचलन/मेहेकर

शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या पोलीस स्टेशनच्या इमारतीने उद्घाटनाआधीच वादाचे रूप घेतले आहे. सुरक्षेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पोलीस स्टेशनच्या नव्या इमारतीच्या भिंतींना तडे गेल्याचे समोर आल्याने बांधकामाच्या दर्जावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. लाखो रुपयांच्या सार्वजनिक निधीतून उभारलेली ही इमारत अद्याप उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असतानाच तिच्या भिंतींना तडे दिसत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जनतेच्या पैशांचा हा खेळ आहे का? असा थेट सवाल आता मेहेकरकरांकडून उपस्थित केला जात आहे. पोलीस स्टेशनसारख्या महत्त्वाच्या आणि संवेदनशील इमारतीचे बांधकामच जर उद्घाटनापूर्वी संशयाच्या भोवऱ्यात सापडत असेल, तर सामान्य नागरिकांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या इमारतीच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का? कामाच्या वेळी गुणवत्तेची तपासणी झाली होती का? संबंधित अभियंते, अधिकारी आणि ठेकेदारांनी आपली जबाबदारी पार पाडली का? असे अनेक प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत. सार्वजनिक पैशातून उभारल्या जाणाऱ्या प्रत्येक इमारतीत दर्जा आणि पारदर्शकता अपेक्षित असताना, मेहेकर पोलीस स्टेशनच्या इमारतीवरील तडे हे व्यवस्थेतील निष्काळजीपणाचे उदाहरण ठरत असल्याची चर्चा सुरू आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून बांधकामाचा दर्जा तपासावा, दोषी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता गृह विभाग आणि बांधकाम विभाग या गंभीर प्रकाराची दखल घेतात का, की हा विषयही कागदोपत्रीच दडपला जातो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जळगाव जामोद सरकटी लाश प्रकरणात डी.जे.पी थेट मैदानात!

## बनावट तपासाच्या धुरळ्यानंतर बुलढाणा पोलिसांची आज खरी अग्निपरीक्षा; सदानंद दाते विचारणार - चूक नेमकी कुणाची?

जनसंचलन/ जळगाव जामोद

जळगाव जामोद पोलीस ठाण्याच्या हद्दीत २६ एप्रिल रोजी उघडकीस आलेल्या सरकटी लाश हत्याकांडाने आता थेट राज्याच्या गृहविभागाचे लक्ष वेधले आहे. या अतिगंभीर प्रकरणाची दखल घेत राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते उद्या ८ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यात दाखल होत असून, जळगाव जामोद पोलीस ठाण्यात तपासाचा थेट आढावा घेणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे संपूर्ण पोलीस दलात अक्षरशः खळबळ उडाली आहे. या प्रकरणात सुरुवातीपासूनच तपासावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. मृतदेहाची ओळख



पटलेली नसताना तपासाचा गोंधळ, नंतर कथित मृत व्यक्तीच जिवंत असल्याचे समोर येणे आणि बनावट तपासाचे आरोप यामुळे बुलढाणा पोलिसांची विश्वासार्हता महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातही चर्चेचा विषय ठरली. तब्बल नऊ अधिकारी आणि २६ अंमलदारांची टीम तपासात असतानाही मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही, ही बाब धक्कादायक मानली जात आहे.

दाते यांचा दौरा केवळ औपचारिक नसून, केस डायरी, स्टेशन डायरी, फॉरेन्सिक नमुने, आंतरराज्य तपासाची दिशा आणि आतापर्यंत पोलिसांनी उचललेली कायदेशीर पावले यांचे बारकाईने परीक्षण होण्याची शक्यता आहे. २६ एप्रिलला मृतदेह मिळूनही गुन्ह्याची ठोस उकल का झाली नाही? सुरुवातीच्या तपासात हलगर्जीपणा झाला का? खोटा तपास कोणी आणि का केला? या प्रश्नांची उत्तरे आता वरिष्ठ अधिकाऱ्यांना द्यावी लागणार आहेत. या दौऱ्यानंतर तपासात निष्काळजीपणा किंवा बनावटपणा आढळल्यास काही अधिकाऱ्यांवर निलंबन किंवा सक्तीच्या बदल्यांची कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ड्रसरकटी लाशफ प्रकरणातील मारेकरीच नव्हे, तर संपूर्ण पोलीस यंत्रणाही धास्तावली आहे. सातपुड्याच्या कुशीत दडलेले हे भयावह रहस्य दाते यांच्या हस्तक्षेपानंतर उघड होणार का, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८